महाराष्ट्र शासन

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय,**

१५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक - ३ सप्टेंबर, २०२०

## संचालक (पर्यावरण व वातावरणीय बदल) या पदावर प्रतिनियुक्तीने भरतीची जाहिरात

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, या विभागामधील संचालक (पर्यावरण व वातावरणीय बदल) पद प्रतिनियुक्तीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

**संचालक (पर्यावरण व वातावरणीय बदल) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत अटी व शर्ती :-**

१) प्रतिनियुक्तीचा कालावधी हा प्रथमत: एक वर्षाचा राहील. सदर प्रतिनियुक्ती कालावधी वाढण्याची शक्यता आहे.

२) अर्जदार भारतीय नागरीक असावा.

३) सदर पदाची वेतनश्रेणी रु.३७४००-६७०००+ग्रेड वेतन रु.८७००/- अशी आहे.(६ व्या वेतनआयोगानुसार) ७व्या वेतनआयोगानुसार एस-२७:११८५००-२१४१०० अशी वेतनश्रेणी आहे.

४) अर्जदार हा विज्ञान शाखेतील प्रथम श्रेणीतील पदव्युत्तर पदवीधारक किंवा रासायनीक अभियांत्रिकी, रासायनिक तंत्रज्ञान, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी किंवा पर्यावरण अभियांत्रिकी या विषयातील प्रथमश्रेणीतील पदव्युत्तर पदवीधारक असावा.

५) वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास शासकीय विभागामध्ये किंवा स्थानिक प्राधिकरणांत किंवा शासनाच्या उदयोग, सार्वजनिक आरोग्य, नगर विकास, सार्वजनिक पाणीपुरवठा, मलनि:सारण किंवा वनीकरण विभागातंर्गत सांविधानिक संस्थेमध्ये जबाबदारीच्या पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.परंतु, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन जसे कि, सार्वजनिक सांडपाणी प्रकिया , घातक कचरा व्यवस्थापन, औद्योगिक व वायु प्रदुषण नियंत्रण यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्य राहील. या पदाचे सविस्तर सेवाप्रवेश नियम संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६) अर्जदाराविरुध्द कोणत्याही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी, तसेच अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

७) अर्जदाराने अर्जामध्ये त्यांची वैयक्तीक माहिती पुरवावी. (संपूर्ण नांव, सध्याचे पद, वेतन श्रेणी, शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, मोबाईल क्रमांक, अनूभव, आजपर्यंत केलेल्या सेवेची/ नियुक्तीची माहिती व अनुषंगिक इतर माहिती)

८) अर्जदाराने आवेदन अर्जावर स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा.

९) सदर पदासाठी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक ३०.९.२०२० हा आहे.

१०) प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छुक अधिकारी यांनी जाहिरातीत नमूद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज दाखल करावेत व अर्जाची एक प्रत अर्जदाराने त्याच्या संबंधित नियुक्ती कार्यालया मार्फत सादर करावी.

९) वर नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इच्छुक अधिकाऱ्यांनी उपरोक्त पदासाठी आपले अर्ज मा.प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, रुम नं.२१७ (विस्तारीत), मंत्रालय,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांच्या नावे दिनांक ३०.०९.२०२० सायंकाळी ४.३० वा. पर्यन्त पाठवावेत. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र अर्जदाराला मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(सु.कि.निकम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन